| राष्ट्रीय सेवा योजना |
|---|
| शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव |

# वार्षिक अहवाल २०२५

**मा**. संचालक तंत्रशिक्षण संचलनालय महारष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट (NSS) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ शासकीय तंत्रनिकेतन जळगाव येथे स्थपन करण्यात आले. त्यासंदर्भात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ & २०२५-२६ वेळोवेळी विविध विद्यार्थी केंद्रित तसेच सामाजिक उपक्रम कार्यक्रम, प्रशिक्षण शिबाराचे अयोजन करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अधिकार्याचे नव व पद | पदनाम |
|---|---|
| डॉ. वि. प्र. काहाळे अधिव्याख्याता, औषधनिर्माणशास्त्र | समन्वयक |
| डॉ. सी. आर. पवार अधिव्याख्याता, औषधनिर्माणशास्त्र | सह-समन्वयक |
| श्रीमती. पी. आर. नेमाडे अधिव्याख्याता, गणित | सह-समन्वयक |
| श्रीमती एस. ए. जैन. अधिव्याख्याता, अनुविद्युत | सदस्य (PO) |
| श्रीमती एस. ए. सरवदे. अधिव्याख्याता, माहिती व तंत्रज्ञान/संगणक | सदस्य (PO) |
| श्री नामदेव आंधळे अधिव्याख्याता, उपयोजित यंत्र | सदस्य (PO) |
| श्री एम. ए. खान, अधिव्याख्याता, यंत्र | सदस्य (PO) |
| श्रीमती आर. पी. देशपांडे, अधिव्याख्याता पदार्थ विज्ञान | सदस्य (PO) |
| श्री निखील एस. वराडे, अधिव्याख्याता, विद्युत | सदस्य (PO) |

वरील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) समिती अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधे वेळोवेळी विविध विद्यार्थी केंद्रित तसेच सामाजिक उपक्रम कार्यक्रम खालील प्रमाणे राबविण्यात आले.

## राष्ट्रीय सेवा योजनेची नोंदणीकृत विद्यार्थी स्वयंसेवक:

सर्व सदस्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व व कार्य याबद्दल विद्यार्थी स्वयंसेवक यांना मार्गदर्शन केले






**शासकीय तंत्रनिकेतन जळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना व क्रेडाई जळगाव भरारी फौंडेशन ,अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

क्रेडाई जळगाव भरारी फौंडेशन व ,राष्ट्रीय सेवा योजना, शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव यांच्या संयुक्त विद्यमानाने या संस्थेतील संपुर्ण परिसरात वृक्षारोपण करण्यात आले आज. दि.०४-०८-२०२५ रोजी गांधी रेसेंर्च फौंडेशन चे अध्यक्ष मा. श्री अशोकभाऊ जैन, शासकीय तंत्रनिकेतन चे प्राचार्य डॉ. पराग पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा.अनिश भाई शाह क्रेडाई महाराष्ट्रचे उपाध्यक्ष, दीपक भाऊ सराफ क्रेडाई जळगाव चे अध्यक्ष तसेच श्री रवींद्र भाऊ लढा MIDC चे अध्यक्ष याच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थेतील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तत्पूर्वी राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. दरम्यान संस्थेतील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी स्वयंसेवक व सर्व मान्यवर १०० झाडांची वृक्ष लागवड तसेच वृक्षारोपणाचे

महत्व, संवर्धन व पर्यावरणीय फायदे यांचे महत्व विषद करत भावी पिढीला स्वच्छ, सुंदर व निरोगी आयुष्य प्रदान करण्याचा हा उत्तम मार्ग तसेच खरी राष्ट्रसेवा ठरणार असल्याचे नमूद केले. मा. श्री अशोकभाऊ जैन, यांनी संस्थेत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची त्यांनी स्तुती केली व असेच समाजपयोगी कार्य करत राहण्यासाठी शभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन रासेयोचे समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी केले. तर आभारप्रदर्शन दीपकभाऊ परदेशी भरारी फौंडेशन यांनी केले. यावेळी मान्यवर मंडळी श्री. निर्णय चौधरी, श्री निलेश पाटील, धनंजय जकातदार, वर्धमान भंडारी तसेच रासेयोचे सहसमन्वयीका श्रीमती पुनम नेमाडे, डॉ. चैताली पवार, विभागप्रमुख, श्री पी ,चौधरी .पी.श्री. के. पी अकोले, , श्री. नेमाडे व श्री. सी. पी. भोळे व रासेयोचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



## शासकीय तंत्रनिकेतनमध्ये १०० रोपांची लागवड

### राष्ट्रीय सेवा योजना, क्रेडाई, भरारी फाउंडेशनचा उपक्रम

तभा वृत्तसेवा
जळगाव, ४ ऑगस्ट

क्रेडाई जळगाव, भरारी फाउंडेशन व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय तंत्रनिकेतन या संस्थेतील संपूर्ण परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

सोमवारी गांधी रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. पराग पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व राज्य क्रेडाईचे उपाध्यक्ष अनिश शाह, क्रेडाई जळगावचे अध्यक्ष दीपक सराफ, सर्जना मीडिया सोल्यूशन्स प्रा. लि. चे कार्यकारी संचालक रवींद्र लड्ढा हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. दरम्यान संस्थेतील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी स्वयंसेवक व सर्व मान्यवर यांनी १०० झाडांची वृक्ष लागवड तसेच वृक्षारोपणाचे महत्त्व, संवर्धन व पर्यावरणीय फायदे यांचे महत्व विषद करत भावी पिढीला स्वच्छ, सुंदर व निरोगी आयुष्य प्रदान करण्याचा हा उत्तम मार्ग तसेच खरी राष्ट्रसेवा ठरणार असल्याचे नमूद केले.

गांधी रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी संस्थेत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांबाबत कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन रासेयोचे समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी केले.

आभार भरारी फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक परदेशी यांनी केले.

यावेळी मान्यवर निर्णय चौधरी, नीलेश पाटील, धनंजय जकातदार, वर्धमान भंडारी तसेच रासेयोचे सहसमन्वयीका पूनम नेमाडे, डॉ. चैताली पवार, विभागप्रमुख, पी.पी. चौधरी, के. पी अकोले, नेमाडे, सी. पी. भोळे, रासेयोचे सदस्य जैन, सरवदे, देशपांडे, आंधळे, खान, वराडे उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना

# शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव









वंदे मातरम सार्ध शाताब्धी मोहत्सव :

महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ०६, जिल्हा पेठ, जळगांव

फोन न. ०२५७ २२२१७२१. Email: principal.gpjalgaon@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. शातंनिज/रासेयो/2025/836 दि. 4/11/2025

**सूचना:-**

संस्थेतील सर्व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की वंदेमातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनासाठी दिनाक ०७/११/२०२५ रोजी मा. मंत्री कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य, यांच्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास सकाळी ठीक ९.०० वाजेपर्यंत पोलिस कवायत मैदान नवीन बस स्थानका समोर ,जळगाव येथे उपस्थित राहावे हे आव्हान करण्यात येत आहे. या कार्यक्रमाकरिता सर्व विभागप्रमुख यांना निवेदन आहे कि त्यांनी विद्यार्थ्यांना वरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याची सूचना करावी.

समन्वयक
शासकीय तंत्रनिकेतन जळगांव

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन जळगांव

## वंदे मातरम् सार्ध शताब्दी महोत्सव

**(प्रस्तावित कार्यक्रम पत्रिका)**

**दिनांक — ७ नोव्हेंबर २०२५** **वेळ — सकाळी ९.३० ते १०.३०**

- ९.३० ते ९.४५ : उद्घाटन, प्रस्तावना आणि मान्यवरांचा सत्कार
- ९.४५ ते १०.०० : लघु नाटिका सादरीकरण
- १०.०० ते १०.१० : कार्यक्रम अध्यक्षांचे भाषण
- १०.१० ते १०.३० : मुख्य वक्त्याचे भाषण
- १०.३० ते १०.३५: समूहगायन - संपूर्ण वंदे मातरम्
- १०.३५ ते १०.४०: आभार आणि समारोप



REDMI NOTE 13 PRO 5G
07/11/2025, 10:44






**राष्ट्रीय सेवा योजना**

**शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव**

## शिवकालीन गड व किल्ले या विषयावर सादरीकरण

२९/०९/२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य साठी जे काही गड व किल्ले जिंकले त्यांचे संवर्धन होण्यासाठी त्या गड किल्याची माहिती आणि महत्व या विषयावर विद्यार्थी स्वयंसेवक याच्यातर्फे सुंदर सादरीकरण करण्यात आले आणि त्याकरिता संपूर्ण शासकीय तंत्रनिकेतन जळगाव मधील विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. कार्याक्रमचे नियोजन व संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सह समन्वयक श्रीमती एस. ए. सरवदे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता श्रीमती लांडगे म्याडम यांनी सुद्धा परिश्रम घेतले मा. उपप्राचार्य तथा विभागप्रमुख श्री. पी. पी. चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ विवेक कहाळे तसेच श्री हर्शल नेमाडे विभागप्रमुख माहिती व तंत्रज्ञान याच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.









# राष्ट्रीय सेवा योजना

# शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव

**स्वच्छता** अभियान: राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृह परिसरात दि. २४/९/२०२५ रोजी स्वछ्यता अभियान राबविण्यात आले श्रीमती नेमाडे आणि श्रीमती देशपांडे तसेच श्री विवेक कहाले आणि श्री जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले












## राष्ट्रीय सेवा योजना

## शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव

**राष्ट्रीय सेवा योजना शासकीय तंत्रनिकेतन जळगाव व जिल्हा एड्स नियंत्रण विभाग व समिती अंतर्गत एचआयव्ही / एड्सला लढा देऊ व नंव परिवर्तन घडवू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

महारष्ट्र राज्य एड्स नियंत्रण शाखा व जिल्हा एड्स नियंत्रण विभाग याच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शासकीय तंत्रनिकेतन जळगाव आयोजित जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एचआयव्ही संसार्गीता साठी सेवा सुविधा व सकारात्मक जीवनशैली, एचआयव्ही मुळे देशाच्या विकासावर होणारा परिणाम तसेच एचआयव्ही संदर्भात युवकांची भूमिका व जबाबदारी आणि औषधोपचार याबद्दल जनजागृती कार्यक्रमाचे आणि विद्यार्थी टेक्निकल प्रेसेंटेशन चे दि. २०/१२/२०२५ रोजी मा. प्राचार्य डॉ. पराग पाटील याच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता जिल्हा एड्स नियंत्रण समिती चे समुपदेशक श्रीमती मनीषा वानखेडे, डॉ. अनुपमा जावरे ART वैद्यकीय अधिकारी आणि उज्वला पगारे यांनी येऊन अधिकारी कर्मचारी तसेच विद्यार्थी यांना एड्स संदर्भात व्याखाने दिली आणि समुपदेशन केले. कार्याक्रमाचा परिचय कार्यक्रम समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी करून दिला. मा. उपप्राचार्य श्री पी. पी. चौधरी, विभागप्रमुख डॉ. चैताली पवार याच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.




## एचआयव्ही एड्स संदर्भात विद्यार्थी टेक्निकल प्रेसेंटेशन

एचआयव्ही एड्स संदर्भात विद्यार्थी टेक्निकल प्रेसेंटेशन घेण्यात आले व त्या करिता जूरी मेम्बर म्हणून डॉ. अनुपमा जावरे ART वैद्यकीय अधिकारी व डॉ. तौफिक काझी औषधनिर्माणशास्त्र विभाग शासकीय तंत्रनिकेतन जळगाव उपस्थितीत प्रथम आणि द्वितीय पारितोषिक करिता औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थिनी हर्षा देशमुख व रुक्सार पटेल तसेच मयुरेश बाजारे आणि प्रतीक्षा सोनवणे यांची निवड करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन रासेयोचे समन्वयक डॉ. विवेक कहाळे यांनी केले. आभारप्रदर्शन रासेयोचे सहसमन्वयक श्रीमती पुनम नेमाडे. यावेळी मान्यवर मंडळी डॉ. राकेश दौंडे, श्री सुनील गायकवाड, श्री खान उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.








# राष्ट्रीय सेवा योजना

# शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव



दिव्य मराठी जळगाव सिटी 26-12-2025

## प्रबोधन • तंत्रनिकेतनच्या एनएसएसतर्फे विद्यार्थी, शिक्षकांना एड्सबाबत जनजागृती



जळगाव | शासकीय तंत्रनिकेतन येथील राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा एड्स नियंत्रण विभाग व समिती अंतर्गत एचआयव्ही, एड्सला लढा देऊ व परिवर्तन घडवू कार्यक्रम नुकताच झाला. सकारात्मक जीवनशैली, एचआयव्हीमुळे देशाच्या विकासावर होणारा परिणाम, एचआयव्ही संदर्भात युवकांची भूमिका व जबाबदारी आणि औषधोपचार याबद्दल जनजागृती कार्यक्रमाचे आणि विद्यार्थी टेक्निकल प्रेझेंटेशनचे प्राचार्य डॉ. पराग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता जिल्हा एड्स नियंत्रण समितीचे समुपदेशक मनीषा वानखेडे, डॉ. अनुपमा जावरे, उज्ज्वला पगारे यांनी अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांना एड्स संदर्भात जनजागृतीपर माहिती दिली. या कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक डॉ. विवेक कहाळे व इतर प्राध्यापक यांनी केले आहे.

भारतीय संविधान दिवस :







## योग साधना

जागतिक योग दिवसा निमित्त राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थिनीन करिता ७ दिवसिय योग शिबीर घेण्यात आले





राष्ट्रीय सेवा योजना
Not Me
But You




राष्ट्रीय सेवा योजना
Not Me
But You

## राष्ट्रीय युवा दिवस

स्वामी विवेकानंद यांच्या 162 वीं जयंती नीमत्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी स्वयंसेवकांना एक दिवसीय मार्गदर्शनपर शिबीर आयोजित करून युवा दिवस साजरा करण्यात आला.















समन्वयक
शासकीय तंत्रनिकेतन जळगांव

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन जळगांव